PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 3, ISSUE 3

# प्राथमिक स्तरावरील शिक्षकांची शैक्षणिक साधन निर्मिती: एक सर्वेक्षणात्मक अभ्यास

**प्रा. दिपक प्रभाकर बाविस्कर**
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**शिरपूर, जि. धुळे. महाराष्ट्र, भारत**

**प्रा. डॉ. तुषार मधुकर माळी**
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**शिरपूर, जि. धुळे, महाराष्ट्र, भारत**

**सारांश-**

प्रस्तुत संशोधन पेपरात प्राथमिक स्तरावरील शिक्षकाकडून शैक्षणिक साधन निर्मिती मागील मतांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे. सहेतूक नमुना निवड पद्धतीने ६९ प्राथमिक शिक्षकांची निवड करण्यात आली होती. माहिती संकलनासाठी संशोधकाची स्वनिर्मित १५ विधानांची प्रश्नावली तयार करण्यात आली होती. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करण्यात आला होता. शैक्षणिक साहित्य तयार करतांना, विद्यार्थ्यांच्या मानसिकेतचा, शैक्षणिक मानसशास्त्राचा विचार केला पाहिजे. तसेच अध्यापनासाठी योग्य शैक्षणिक साहित्याची निवड शिक्षकांच्या कलात्मकतेवर अवलंबून असते असे मते शिक्षकांनी नोंदवली आहेत.

**प्रस्तावना-**

प्राचिन काळापासूनच शिक्षण व्यवस्थेत अध्ययन अध्यापनातील प्रभावी संप्रेषणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. शाळेतील मुलांना प्रभावी अध्यापन करता यावे यासाठी अधिक संदर्भ ग्रंथ, अधिक उदाहरणाचा, तसेच शिक्षकांच्या सादरीकरणाला अधिकाअधिक महत्त्व दिले जाते. याचबरोबर सर्वात महत्त्वाचे म्हणजे शैक्षणिक साधने, शैक्षणिक साधनाचा वापर हा एका प्रभावी संप्रेषणाइतका अविभाज्य भाग मानला जात असतो. वर्गात अध्यापन करतांना शैक्षणिक साहित्याचा वापर व्हावा यासाठी सर्वस्वी प्रयत्न केले जात असतात. आजच्या या ज्ञानरचनावादाच्या युगात शैक्षणिक साहित्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणाच्या पूर्वप्राथमिक स्तरापासून तर उच्चशिक्षणापर्यंत प्रत्येक आशयाला अनुसरुन शिक्षक आपले शैक्षणिक साहित्य निर्मिती करतो आणि त्याचा वापर अध्यापनासाठी करतो.

प्राथमिक शिक्षणाचा कालावधी हा विद्यार्थी जीवनाचा महत्त्वपूर्ण कालावधी असतो. याठिकाणी शिक्षकांना अत्यंत जागृतपणे आपला विषय सादर करावा लागतो. तो विद्यार्थ्यांना समजावा आणि त्यातून विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि बौध्दिक विचाराला चालना मिळावी हा उद्देश असतो आणि यासाठी शिक्षक सतत प्रयत्नशील असतो. मुले लहान असतात, त्यांना केवळ शिकविणे व्यर्थ मानले जाते. त्यांच्यासमोर तसे एखादे उदाहरण चित्रांच्या

रुपाने उभी केल्यास ती गोष्ट त्यांना लवकर लक्षात येते. हया गोष्टी अधिक काळापर्यंत विसरु शकत नाही. म्हणूनच शिक्षकाला शैक्षणिक साहित्य नेहमीच लक्षवेधक पद्धतीने तयार करावी लागत असतात.

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्तरावरील शिक्षकांच्या शैक्षणिक साहित्य निर्माण करण्यामागच्या मतांचा अभ्यास केला आहे. शैक्षणिक साहित्य हे प्राथमिक स्तरावर महत्त्वाचे कार्य करत असते. शैक्षणिक साधनाने शिक्षकांच्या अध्यापनाची परिणामकारकता वाढत असून अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ होते. प्राथमिक स्तरावरील मुलांना चित्रांच्या सहाय्याने अध्यापन केल्यास त्यांना त्या गोष्टी लवकर आकलन होतात. अशावेळेस प्राथमिक स्तरावरील शिक्षकाची शैक्षणिक साधनासंदर्भात काय भूमिका आहे हे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

**समस्याविधान-**

प्राथमिक स्तरावरील शिक्षकाकडून शैक्षणिक साधन निर्मिती मागील (शैक्षणिक, मानसिक, अभिरुची, आशय) मतांचा अभ्यास करणे.

**उद्दिष्ट-**

प्राथमिक स्तरावरील शिक्षकाकडून शैक्षणिक साधन निर्मिती मागील मतांचा अभ्यास करणे.

**पद्धती- संशोधन पद्धती-**

प्राथमिक स्तरावरील शिक्षकांकडून शैक्षणिक साधन निर्मितीमागील सद्यस्थितीतील मतांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या-**

शरपूर तालुक्यातील ०१ ते ०५ वीच्या वर्गाला अध्यापन करणारे सर्व प्राथमिक शिक्षकांची प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चिती केली होती.

**न्यादर्श-**

सहेतुक नमुना निवड पद्धतीने शिरपूर तालुक्यातून एकूण ६९ शिक्षकांची निवड करण्यात आली होती. त्याचे विवरण पुढील प्रमाणे.

| जि. प. शाळा | | अनुदानित प्राथमिक शाळा | | विनाअनुदानित प्राथमिक शाळा | | इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरूष शिक्षक | स्त्री शिक्षक | पुरूष शिक्षक | स्त्री शिक्षक | पुरूष शिक्षक | स्त्री शिक्षक | पुरूष शिक्षक | स्त्री शिक्षक |
| १० | १० | १० | १० | १० | १० | ०५ | ०४ |
| **एकूण - ६९** | | | | | | | |

**संशोधन साधन-**

प्रस्तुत संशोधनात संशोधकास प्राथमिक स्तरावरील शिक्षकांकडून शैक्षणिक साधन निर्मिती संदर्भात मतांचा अभ्यास करावयाच्या असल्याने त्याअनुषंगाने साधनाचे महत्त्व, उद्देश, आशय, प्रत्यक्ष वापर, खर्च इ. घटकांवर आधारीत १५ प्रश्न तयार करण्यात आले होते. सहमत, असहमत व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. सदर प्रश्नावली तयार करताना संशोधन तज्ज्ञ, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच प्रत्यक्ष प्राथमिक स्तरावर अध्यापन करणा-या अनुभवी शिक्षकांकडून ती तपासून घेण्यात आली होती.

**संख्याशास्त्रीय परिमाणे-**

प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी 'टक्केवारी' या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करण्यात आला होता.


**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन-**

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शाळेतील शिक्षकांना एक प्रश्नावली देण्यात आली होती. त्या प्रश्नावलीला प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले होते.

**प्रश्न क्रमांक ०१: शिक्षकांनी नेहमीच वर्गात शैक्षणिक साधनांचा वापर केला पाहिजे.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| **सहमत** | ५४ | ७८ |
| **असहमत** | १० | १५ |
| **सांगता येत नाही** | ५ | ०७ |
| **एकूण** | ६९ | १०० |


**निरीक्षण-** वरील विधानास, ७८% सहमत, १५% असहमत व ०७ शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्या मते, प्रत्येक शिक्षकांने वर्गात शैक्षणिक साधनांचा वापर केला पाहिजे.




**प्रश्न क्रमांक ०२: शिक्षकांनी नेहमी स्वतः शैक्षणिक साहित्य निर्मिती केली पाहिजे.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| **सहमत** | ६० | ८७ |
| **असहमत** | ०५ | ०७ |
| **सांगता येत नाही** | ०४ | ०६ |
| **एकूण** | ६९ | १०० |


**निरीक्षण-** वरील विधानास, ८७% सहमत, ०७% असहमत व ०६% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुनअधिकतर शिक्षकांच्या मते, शिक्षकांनी स्वतः शैक्षणिक साहित्य निर्मिती केली पाहिजे.



**प्रश्न क्रमांक ०३: आधुनिक युगात शैक्षणिक साधनांना, संगणक हे पर्याय म्हणून पुढे येत आहे.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| **सहमत** | ४० | ५८ |
| **असहमत** | २० | २९ |
| **सांगता येत नाही** | ०९ | १३ |
| **एकूण** | ६९ | १०० |


**निरीक्षण-** वरील विधानास, ५८% सहमत, २९% असहमत व १३% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्या मते, संगणक हे शैक्षणिक साधनांना पर्याय म्हणून पुढे येत आहे.




**प्रश्न क्रमांक ०४: शैक्षणिक साहित्य तयार करणे खर्चिक असते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| **सहमत** | २० | २९ |
| **असहमत** | ४२ | ६१ |
| **सांगता येत नाही** | ०७ | १० |
| **एकूण** | ६९ | १०० |

**निरीक्षण-** वरील विधानास, २९% सहमत, ६१% असहमत व १०% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्या मते, अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्य तयार करणे खर्चिक नाही.




PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 3, ISSUE 3

**प्रश्न क्रमांक ०५: पाठय पुस्तकातील प्रत्येक आशय घटकाच्या अध्यापनात शैक्षणिक साधनांची आवश्यकता नसते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ४३ | ६२ |
| असहमत | १० | १५ |
| सांगता येत नाही | १६ | २३ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण-** वरील विधानास, ६२% सहमत, १५% असहमत व २३% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुनअधिकतर शिक्षकांच्या मते, प्रत्येक आशयासाठी शैक्षणिक साधन तयार केले पाहिजे असे नाही.




**प्रश्न क्रमांक ०६: शैक्षणिक साहित्य निर्मितीत विद्यार्थ्यांच्या मानसिकेतचा विचार केला जात असतो.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ६१ | ८८ |
| असहमत | ०२ | ०३ |
| सांगता येत नाही | ०६ | ०९ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण-**वरील विधानास, ८८% सहमत, ०३% असहमत व ०९% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्या मते, शैक्षणिक साहित्य निर्मितीत विद्यार्थ्यांच्या मानसिकेतला महत्त्व दिले जाते.




**प्रश्न क्रमांक ०७: अध्यापनासाठी योग्य शैक्षणिक साहित्याची निवड शिक्षकांच्या कलात्मकतेवर अवलंबून असते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ६३ | ९१ |
| असहमत | ०१ | ०२ |
| सांगता येत नाही | ०५ | ०७ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण-**वरील विधानास, ९१% सहमत, ०२% असहमत व ०७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्या मते, अध्यापनासाठी शैक्षणिक साहित्याची निवड शिक्षकांच्या कलात्मकतेवर अवलंबून असते.



**प्रश्न क्रमांक ०८: शैक्षणिक साहित्य हे पाठयपुस्तकाला पर्याय होवू शकते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ०९ | १३ |
| असहमत | ५८ | ८४ |
| सांगता येत नाही | ०२ | ०३ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण**-वरील विधानास, १३% सहमत, ८४% असहमत व ०३% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्या मते, शैक्षणिक साहित्य हे पाठयपुस्तकाला पर्याय होवू शकत नाही.




**प्रश्न क्रमांक ०९: शैक्षणिक साहित्याची निर्मिती पाठातील आशय घटकांच्या उद्दिष्टांवर अवलबून असते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ५३ | ७७ |
| असहमत | ०९ | १३ |
| सांगता येत नाही | ०७ | १० |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण**-वरील विधानास, ७७% सहमत, १३% असहमत व १०% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्यामते शैक्षणिक साहित्याची निर्मिती पाठातील आशय घटकांच्या उद्दिष्टांवर अवलबून असते.




**प्रश्न क्रमांक १०: एक शैक्षणिक साहित्य हजार शब्दांचे कार्य करु शकते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ६२ | ९० |
| असहमत | ०२ | ०३ |
| सांगता येत नाही | ०५ | ०७ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण**-वरील विधानास, ९०% सहमत, ०३% असहमत व ०७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्यामते एक शैक्षणिक साहित्य वर्गात हजार शब्दाचे कार्य करु शकते



**प्रश्न क्रमांक ११: हाताने तयार केलेल्या शैक्षणिक साहित्यापेक्षा कृत्रिम शैक्षणिक साहित्य अधिक प्रभावी असतात.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ४८ | ७० |
| असहमत | ११ | १६ |
| सांगता येत नाही | १० | १४ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण**-वरील विधानास, ७०% सहमत, १६% असहमत व १४% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्यामते, कृत्रिम शैक्षणिक साहित्य हे हाताने तयार केलेल्या साहित्यापेक्षा अधिक प्रभावी असतात.




**प्रश्न क्रमांक १२: शैक्षणिक साहित्य रोज वर्गात घेवून जाणे एक कंटाळवाणे कार्य वाटते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | १८ | २६ |
| असहमत | ४६ | ६७ |
| सांगता येत नाही | ०५ | ०७ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण**-वरील विधानास, २६% सहमत, ६७% असहमत व ०७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्यामते, शैक्षणिक साहित्य रोज वर्गात घेवून जाणे कंटाळवाणे वाटत कार्य वाटत नाही.




**प्रश्न क्रमांक १३: भाषा अध्यापनासाठी कोणत्याही प्रकारच्या शैक्षणिक साहित्याची गरज नसते.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | १८ | २६ |
| असहमत | ४६ | ६७ |
| सांगता येत नाही | ०५ | ०७ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण**-वरील विधानास, २६% सहमत, ६७% असहमत व ०७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्यामते, भाषा अध्यापनासाठी सर्व प्रकारच्या शैक्षणिक साहित्याची गरज असते.



**प्रश्न क्रमांक १४: शैक्षणिक साहित्य निर्मितीत शैक्षणिक मानसशास्त्रातील संकल्पनाचा विचार केला जातो.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ६२ | ९० |
| असहमत | ०२ | ०३ |
| सांगता येत नाही | ०५ | ०७ |
| एकूण | ६९ | १०० |


**निरीक्षण**-वरील विधानास, ९०% सहमत, ०३% असहमत व ०७% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्यामते, शैक्षणिक साहित्य निर्मितीत शैक्षणिक मानसशास्त्रातील संकल्पनाचा विचार केला जात असतो.




**प्रश्न क्रमांक १५: संगणकावरील शैक्षणिक साहित्याचा मुलांना काही काळानंतर कंटाळा येतो.**

| | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सहमत | ५३ | ७७ |
| असहमत | ०९ | १३ |
| सांगता येत नाही | ०७ | १० |
| एकूण | ६९ | १०० |

**निरीक्षण**-वरील विधानास, ७७% सहमत, १३% असहमत व १०% शिक्षकांनी सांगता येत नाही असे मत दर्शविले आहे. यावरुन अधिकतर शिक्षकांच्यामते, संगणकावरील शैक्षणिक साहित्याचा मुलांना काही काळानंतर कंटाळा येतो.



**निष्कर्षावरील आधारीत चर्चा-**

प्रस्तुत संशोधन पेपरात संशोधकाने एकूण १५ विधानाची प्रश्नावली शिक्षकांना दिली होती. त्या प्रश्नावलीला दिलेल्या प्रतिसादावरुन लक्षात येते की, शैक्षणिक साहित्य हा अध्यापनाचा एक महत्त्वपूर्ण घटक असतो. एक प्रभावी शैक्षणिक साहित्य अध्ययन अध्यापनास उत्कृष्ट दर्जा प्राप्त करुन देते. बहुतेक शिक्षकांच्या मते, शैक्षणिक साहित्य तयार करतांना, विद्यार्थ्यांच्या मानसिकेतचा, शैक्षणिक मानसशास्त्राचा विचार केला पाहिजे. तसेच अध्यापनासाठी योग्य शैक्षणिक साहित्याची निवड शिक्षकांच्या कलात्मकतेवर अवलंबून असते असे मते शिक्षकांनी नोंदवली आहेत.

प्रत्येक शिक्षकांस शैक्षणिक साहित्य निर्मिती करण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यासाठी विविध कार्यशाळा, सेमिनार व उद्बोधन वर्गाचे आयोजन केले पाहिजे. शैक्षणिक साहित्य वापरण्यासाठी प्रेरणा व आवश्यक केले पाहिजे. शासनानेही शिक्षकांसाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा आयोजित करुन त्यांच्यासाठी आधुनिक शैक्षणिक साहित्यासंदर्भात मार्गदर्शन केले पाहिजे.

**संदर्भग्रंथसूची**

Best & Kahn. (2006). *Research in Education* (9th Ed). Delhi: Prentice Hall of India.

Garrett H .E. (2006). *Statistics in Psychology & Education* (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.

Kahn, J.A. (2011). *Research Methodology* (1st Ed). Delhi: APH Publishing Corporation.

Khan, Sharif. (2009). *Educational Research* (1st Ed). Delhi: APH Publishing Corporation.

Kumar, Ranjit. (2011). *Research Methodology a step by step guide for beginners* (3rd Ed). New Delhi: Sage Publication.

https://en.m.wikipedia.org/wiki/Audiovisual_eduction

देसाई आणि अभ्यंकर. (२०१७). *संशोधन पद्धती आणि मानसशास्त्रीय मापन.* पूणे: नरेंद्र प्रकाशन.

संत, दु.का. (२०१०). *संशोधन- पद्धती, प्रक्रिया, अंतरंग.* पूणे: पूणे विद्यार्थी गृह प्रकाशन.

जोशी बी. आर. (२००७) *सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दांताचा कोश (मानसशास्त्र)* पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.

पंडित, ब. बि. आणि मोरे, लता. (२०१०). *शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग.* नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.